**रे.मु.नं. २७५/२०१७**
**निशाणी कमांक २१ लगत**

**मी दत्तु भागवत काळे निशाणी २१ वरील शपथपत्रातील मजकुर वाचला आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.**

**पुढील सरतपास वादीतर्फे विधीज्ञ यु.बी. घोरपडे यांच्यातर्फे-**

६. मी निशाणी क्र. ३ सोबत मौजे आडगाव खुर्द ता. राहाता येथील गट नंबर १४७, १३४, १३२ चे सातबारा उतारे दाखल केले आहे. ते अनुक्रमे **निशाणी क्रं. २२ ते २४** वर आहे. आता मला सदर प्रकरणातील निशाणी क्रं. ३ सोबत दाखल केलेले रजिस्टर्ड दस्त क्रं. २८३६/२०१७ ची प्रमाणित प्रत दाखवण्यात आली. त्यावर माझी लिहून देणार म्हणून अ.क्रं. ३ वर सही आहे. त्या दस्तामधील मजकूर खोटा आहे. सदर रजिस्टर्ड दस्त क्रं. २८३६/२०१७ ची प्रमाणित प्रत **निशाणी क्रं. २५** वर आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ एस.बी.शेख यांच्यातर्फे :**

७. माझे शिक्षण १२वी पर्यंत झालेले आहे. मला लिहिता वाचता येते. सदर दावा वाटपासाठी केलेला आहे. मी सदर दाव्यामध्ये गट नंबर १४७, १३४, १३२ चे वाटप करून मागितले आहे. आम्ही चार जण भाउ आहोत. माझी आई हयात आहे. आम्ही चौघे भाउ वेगवेगळे राहतो. आमचे चौघा भावाचे जेवणखान वेगवेगळे आहे. हा दावा दाखल करण्यापूर्वी दोन ते तीन वर्षापासून आम्ही चौघे भाउ वेगवेगळे राहतो. आमचे चार भावांची घरे वेगवेगळी आहेत.

**प्रश्न -** तुम्ही चौघे भाउ वेगवेगळी शेती करता?

**उत्तर -** नाही.

**प्रश्न -** तुम्ही जी शेती करता ती जमीन हलक्या प्रतीची आहे?

**उत्तर -** मी जमीन करीत नाही.

८. हे म्हणणे खरे नाही की, घराचे मिळकतींचे वाटप झाल्यामुळे आम्ही चौघे भाउ वेगळे रा. हतो. वडीलांचे घर नाही. गट नंबर १४७ मधील अंदाजे ४० आर क्षेत्र ओढ्यात गेले आहे. गट नंबर १४७ मधील ४० आर क्षेत्र ओढ्यात गेले आहे ते माझ्या शपथपत्रात नमुद नाही.

प्रश्न - रजिस्टर्ड दस्त क्रं. २८३६/२०१७ वर तुम्हाला सही करण्यास कोणी सांगितले?

उत्तर - घरच्या सगळ्यांनी मला सांगितले.

हे म्हणणे खरे नाही की, रजिस्टर्ड दस्त क्रं. २८३६/२०१७ मध्ये मी प्रतिवादी क्रं. ६ ते ९ यांना हक्कसोड पत्र करून दिले. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी ५ ते ९ यांच्याविरूध्द माझी या दाव्यात काही मागणी नाही असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, रजिस्टर्ड दस्त क्रं. २८३६/२०१७ मध्ये लिहून देणार मध्ये माझेसोबत मोहणीराज काळे, मिनीनाथ काळे, शिवाजी काळे यांची नावे व सह्या आहेत.

९. मी सदरचा दस्त वाचणेसाठी कोणाकडे मागितला होता त्याचे नाव मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी बारावी झालेलो असल्यामुळे कागद वाचून सही करत असतो. मी रजिस्टर्ड दस्त क्रं. २८३६/२०१७ हा माझेकडून फसवणूक करून सही करून घेतला याबद्दल मी पोलीस स्टेशनला लेखी तक्रार दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, २० वर्षापूर्वी आमच्या वाटण्या झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला हलक्या प्रतीची जमीन आली म्हणून हा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

दिनांक : ०1/०३/२०२५

(एस. एस. मुलाणी)
३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
राहाता.